## A Survey on GST Holder Traders in Chikhli Taluka Regarding Goods and Service Tax.

### Summary of the Report

A new goods and service tax come into force in India from July 1st 2017. It was stated that one nation, one tax and single market would be created across the country and the economy benefit from it. It was also said that due to the goods and service tax system excise duty business tax sales tax entertainment tax advertisement tax and service tax will remain a single tax . But in reality, after the implementation of this system, it was seen that many types of confusion arose among the traders as well as the common citizens and the government.The government has reformed the system several times.Accordingly, college students should be informed about GST, understand the new tax system and what are the reactions of traders in Chikhli taluk regarding this system, how do they feel about this system.For this, in the two months , December 2018 and January 2019, 80 students of B.Com second year, Head of the Department of Business Economics, Prof.Prof. Vijay Wakode was conducted a survey on "A Survey of GST Holder Traders in Chikhli Taluka regarding Goods and Services Tax System".Due to the said survey, the students were able to study the techniques of conducting interviews, the techniques of preparing questionnaires and actually meeting the traders and their views on GST etc.

Five questionnaires each to 80 students i.e. total 400 questionnaires were filled by GST holder traders in Chikhli taluka. Many traders refused to give their GSTIN, they had to say that this questionnaire will be used for educational purposes only and the information provided by them will be kept strictly confidential and such instruction was mentioned in the questionnaire.

A total of 12 GST related questions were included in the said questionnaire.The eleventh and twelfth questions were analytical in nature.Remaining 10 questions were objective in nature. Apart from filling the questionnaire, the students also conducted face-to-face interviews with the traders.Recommendations and measures have been suggested based on the findings regarding GST through the said survey.It is believed that this survey will be very important to find out the problems faced by traders due to GST, how to make the process simpler and easier.

**Prof. Vijay Kundlik Wakode.(Survey Coordinator)**

**Head Department of Business Economics,**

**S.P.M.T.M. Art's and Commerce College Chikhli Dist Buldhan**

S.P.M.T.M.Arts & Commerce College,

CHIKHLI - Dist.Buldana.

# चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवाकर प्रणाली संदर्भात सर्वेक्षण

## सर्वेक्षण समन्वयक

प्रा. विजय कुं. वाकोडे

( M.A,(ECO) NET,SET, M.Com.NET,SET,B.Ed,DBM.JLPTN5 )

सन - २०१८-१९

शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,
चिखली. जिल्हा - बुलडाणा.

## व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग

# सर्वेक्षण अहवाल
## सत्र २०१८ - १९

# “ चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवाकर प्रणालीसंदर्भात सर्वेक्षण ”

सर्वेक्षण समन्वयक
प्रा. विजय कुंडलिक वाकोडे
(M.A.,NET, SET, M.Com. NET, SET B.Ed, DBM, JLPTN5)

॥ विद्या परं दैवतम् ॥
SHIKSHAN PRASARAK MANDALS
Tatyasaheb Mahajan Arts & Commerce College,
CHIKHLI Dist. Buldana - 443201 (M.S.) Fax No. (07264) 242075
Accredited with B+ NAAC
Website : spmtmchikhali.org. E-mail - principaldrtarespmchikhli@gmail.com
चिखली

जा क्र. एसपीएम/वस्तूवसेवाकर/२०१८-१९/ . दिनांक :- ____________

प्रति,
मा. सर्व व्यापारी वर्ग ( GST धारक)
चिखली तालुका,
जि.बुलडाणा.

विषय :- वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात प्रश्नावली भरुन देणे बाबत.

महोदय,

आमच्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग, 'चिखली तालुक्यातील (GST धारक) व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण' करीत आहे. त्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी आपणाकडे प्रश्नावली भरुन घेण्यासाठी आले आहेत.

कृपया आपण ती प्रश्नावली भरुन देण्यासाठी सहकार्य करावे. आपण दिलेल्या माहितीचा उपयोग केवळ शैक्षणिक कार्यासाठीच केला जाईल तसेच आपण दिलेली माहिती गोपनिय ठेवण्यात येईल.

आपले विश्वासु,

( प्रा. विजय कुंडलिक वाकोडे )
समन्वयक,
GST सर्वेक्षण
मो.नं.९८६०३०९५३८

( डॉ. अनिल स.पुरोहित )
प्र. प्राचार्य,
PRINCIPAL
S. P. M. T.M. Arts & Commerce College
CHIKHLI 443201 (Dist.Buldana)

**शि.प्र.मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली जि.बुलडाणा**

## अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग

**" चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तु व सेवा कर प्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण " या विषयाची प्रश्नावली**

नांव : कैलास घनश्याम देशमाने

पत्ता :

वार्षिक टर्नओव्हर : 2,90,00,000 रुपये. GST No.: 27ARLPD8848H1Zc

**टिप : खालील माहितीचा वापर केवळ शैक्षणिक कार्यासाठीच केला जाईल व ही माहिती गोपनिय ठेवण्यात येईल.**

१ अगोदरच्या करप्रणालीपेक्षा वस्तु व सेवा कर प्रणाली आपणास कशी वाटते ?
अत्यंत सोपी ☐ सोपी ☑ कठीण ☐ अत्यंत कठीण ☐

२ GST अंतर्गत येणाऱ्या वस्तु व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत काय ?
होय ☑ नाही ☐ P.T.O....

३ GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय ?
होय ☐ नाही ☑ Subject to seasonable nature of Retail Business of any bussinessman. P.T.O....

४ GST भरतांना अडचणी उद्भवतात काय ?
होय ☑ नाही ☐ P.T.O....

५ अडचणी उद्भवत असल्यास त्या कोणत्या प्रकारच्या आहेत ?
तांत्रिक ☐ वेळखाऊ ☐ इतर ☑ P.T.O....

६ GST मुळे व्यापारावर काही परीणाम झाला आहे काय ?
होय ☑ नाही ☐

७ परिणाम झाला असल्यास तो कशा प्रकारचा आहे?
सकारात्मक ☑ नकारात्मक ☑ मुळीच नाही ☐
P.T.O....

८ GST चा वस्तुच्या किमतीवर परिणाम झाला आहे काय?
होय ☑ नाही ☐ P.T.O....

९ किमतीवर परिणाम झाला असल्यास तो कशा प्रकारचा आहे?
किंमती वाढल्या ☑ किंमती कमी झाल्या ☐ अगोदर जशा होत्या तशाच आहेत. ☐
P.T.O....

१० GST प्रणालीमुळे ग्राहकांच्या संख्येवर परिणाम झाला आहे काय?
संख्या वाढली ☐ संख्या कमी झाली ☐ स्थिर आहे ☑ परंतु खरेदीच्या क्षमते च्या प्रमाणात विक्रि वस्तुच्या विक्री होत असुन काही वस्तुची विक्रीच्या प्रमाणात घट झालेली आहे

११ GST प्रणालीबाबत कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे असे आपणास वाटते.

① हंगामी व्यवसायाच्या पद्धतीच्या व्यवसायीकाकडुन विशीष्ट तिमाहीमध्ये GST Return filing होऊ शकले नसल्यास पुढील तिमाही च्या वेळ मिळावा (H1/H2) त्या नंतर मात्र filing केले नसल्यास अशा केल्यास लेट फी किंवा पेनाल्टी लावावी. [illegible]

१२ GST प्रणालीबाबत आपले थोडक्यात मत.

② GST Rate Rewise झाल्यानंतर त्याचा लाभ किरकोळ विक्रेत्यासोबत अंतिम ग्राहका पर्यंत पोहोचे पर्यंत शासनाने लक्ष घालावे.

③ GST Rate चे slab सध्य कमी करुन त्या वस्तुच्या किंमती घटल्यामुळे विक्रीच्या प्रमाणाच्या संधीत वाढ होऊन कर वसुलीमध्ये तात्पुरती घट होणार नाही व बाजारातील संधीच्या प्रमाणात वाढ होईल किंवा घट होण्याची शक्यता कमी असेल. GST Rate कमी करावे जेणेकरुन शासनाच्या तिजोरीवरही तसेच अशा वस्तुंवर नकारात्मक परिणाम होणार नाही

(प्रा.[illegible] समन्वयक [illegible])

(व्यावसायिक अर्थशास्त्र, विभाग प्रमुख)

प्रश्नावली भरणाऱ्याचे नाव व स्वाक्षरी

[signature]

प्रश्न क्र. ② त्या वस्तूंच्या वापर करणे अपरिहार्य अशा वस्तू जर १२%,१८%, या कर प्रणालीमुळे दर वाढ होऊन अंतिम ग्राहक वापर करणे टाळतो किंवा वापराचे प्रमाण कमी करतो. परिणामी जनजीवनावर आर्थिक भार वाढतो.

उदा.- Ⓐ सूक्ष्म अन्नद्रव्ये = १२% GST slab - जमिनीची सुपीकता टिकवून उत्पादनाची पातळी व गुणवत्ता खालावते (Zn, Boron, MN, Cu)

Ⓑ किटकनाशके (बुरशीनाशके, तणनाशके) = १८% GST slab - कृषी क्षेत्रातील उत्पादन व उत्पादनाची गुणवत्ता हि Agrochemicals च्या वापरावर अवलंबून असून ग्राहक वर्ग कोणता तरी एकच पर्याय वापरून पिक संरक्षणामध्ये वापर करण्याचे आवश्यक असून सुद्धा टाळाटाळ करतात पर्यायाने उत्पादनाची पातळी व गुणवत्ता घसरत आहे.

प्रश्न क्र. ③ व ④ किरकोळ विक्री व्यवसायात हंगामी काळात अति व्यस्तता असल्यामुळे बऱ्याच अंशी वेळेवर सादरीकरण करताना उशीर होतो त्यामुळे वेळेचीच समस्या उद्भवते.

प्रश्न क्र. ⑤ किरकोळ व्यवसायीकांना कुशल मनुष्यबळ पुर्णवेळ व नियमीत उपलब्ध होण्यासाठी मिळकत कमी व लागत अधिक असल्यामुळे संगणकीकृत काम पार पाडण्यामध्ये अडचणी येतात.

प्रश्न क्र. ⑥ सकारात्मक १००% पारदर्शी व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांसाठी स्पर्धेचे (unhealthy competition) भय राहिलेले नाही परंतु अजूनही कर प्रणाली डावलून व्यवसाय करणारी मंडळी Price war करीत आहे.

नकारात्मक → अंतीम ग्राहकांची क्रयशक्ती घटल्यामुळे बाजारावर परिणाम होऊ लागलेला स्पष्टपणाने जाणवत आहे. व्यापार थंडावलेले जाणवत आहेत.

प्रश्न क्र. ⑦ मागील वर्षी रा. खतांच्या किंमतीत १%ची घट झाली होती परंतु किटकनाशकांच्या किंमती घटण्याची शक्यता असताना त्या वाढलेल्या जाणवल्या. आगामी येणाऱ्या वर्षासाठी रा. खते, किटकनाशकांमध्ये १०% ते १५% नी किंमती वाढत असल्याचे संकेत मिळू लागले आहेत.

प्रश्न क्र. ⑧ GST प्रणालीमुळे पारदर्शकतेमध्ये सुधार झाल्यामुळे कर चुकवेगीरीच्या प्रमाणात घट झालेली दिसते. तसेच आयकराच्या ताळेबंद आपसुकच जुळण्याच्या परिणाम व्यवसायकांवर Income Tax ची Liability वाढून शासनाची तिजोरी भरण्याच्या प्रमाणात वाढ

शि.प्र.मं.तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,
चिखली. जिल्हा - बुलडाणा.

## व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग

# सर्वेक्षण अहवाल

## सत्र २०१८ - १९

# “ चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवाकर प्रणालीसंदर्भात सर्वेक्षण ”

**सर्वेक्षण समन्वयक**

**प्रा. विजय कुंडलिक वाकोडे**

(M.A.,NET, SET, M.Com. NET, SET B.Ed, DBM, JLPTN5)

# "चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण "

प्रस्तावना ( **Introduction** ) :-

भारतात १ जुलै २०१७ पासून नविन करप्रणाली वस्तू व सेवा कर GST लागू झाली आहे. त्यामुळे संपुर्ण देशात एकच कर व्यवस्था अस्तित्वात येणार आहे. वस्तू व सेवा कर ही अप्रत्यक्ष कर प्रणाली आहे.

वस्तू म्हणजे ज्या आपण खरेदी करु शकतो जसे की, मोबाईल, संगणक ,वाहने इ. विकत घेतांना आपल्याला कर लावलेल्या किंमतीला खरेदी कराव्या लागतात. त्या वस्तूच्या ठिकाणानुसार वेगवेगळया किंमती असू शकतात. सेवा म्हणजे ज्या आपण प्रत्यक्षात खरेदी करु शकत नाही पण त्यांचा उपभोग घेऊ शकतो. जसे की, रेस्टॉरंट,हॉटेल्स, चित्रपटगृह,मॉल्स इ.

भारतीय संविधानाच्या १२२ व्या घटना दुरुस्तीद्वारे वस्तू व सेवा कर प्रणाली भारताने स्विकारली आहे.

या प्रणालीनुसार एकच वस्तू व सेवांवर वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे कर भरावे लागणार नाही. फक्त मद्य(दारु)यातुन वगळण्यात आली आहे. रॉकेल,पेट्रोल,डिझेल व गॅस यांचे दर जैसे थे राहणार आहेत. वस्तू व सेवा कर प्रणालीमुळे एक राष्ट्र, एक कर आणि एकसंघ बाजारपेठ ही संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. वस्तू व सेवा कर प्रणालीमुळे सरकारचे एक्साईज डयुटी,व्यवसायिक कर,विक्री कर, मनोरंजन कर, प्रवेश कर,खरेदी की, जाहिराती कर, तसेच सेवा कर हे कायमचे निघून जाऊन फक्त वस्तू व सेवा कर हा एकच प्रकारचा कर सर्व वस्तू व सेवांसाठी लागू झाला आहे.

सर्व प्रथम फ्रान्स या देशानं १९४८ साली वस्तू व सेवा कर प्रणाली सुरु केली त्यानंतर जवळपास १५० देशांमध्ये ही कर प्रणाली अस्तित्वात असून या प्रणालीचा अवलंब केल्यानंतर सुरुवातीच्या काळात जरी वस्तु व सेवा महाग होत असल्या तरी एक ते दिड वर्षाच्या कालावधीनंतर बऱ्याच देशात महागाई कमी झाल्याचे निदर्शना स आले आहे. ठराविक कालावधीनंतर वस्तू व सेवा कराचा अर्थवस्थेवर चांगला परिणाम झाला असल्याचे दिसून आले आहे.

* ***GST चा सामान्य जनतेला होणारा फायदा :-***

GST ची अंमलबजावणी करतांना तिचे सामान्य जनतेला काय फायदे होतील हे GST कायदा करतांना सांगितले आहेत ते खालीलप्रमाणे.

१. सर्व वस्तूचे समान दर असणार त्यामुळे खरेदीसाठी दुसऱ्या ठिकाणी जाण्याची आवश्यकतां नाही परिणामत: स्थानिक बाजारपेठेला चालना मिळेल.

२. सद्यस्थितीत आपण खरेदी करत असलेल्या वस्तूवर ३० ते ३५ टक्के कर लागतो तो कमी होवून २०-२५ टक्क्यांपर्यतच लागणार परिणामत: महागाई काही प्रमाणात कमी होवू शकते.

* <u>व्यवसाय व उद्योजकांना होणारे फायदे :-</u>

१. विविध किचकट कर भरणा पध्दतीपासुन सुटका .

२. सामान एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी पाठविणे सोपे जकात वॅट (VAT)दरवेळी भरण्याची गरज नाही.

३. एका राज्यात उत्पादित माल दुसऱ्या राज्यात कोणताही कर न लागता विक्री करता येईल.

४. कर चूकवेगिरीला आळा.

५. सकल उत्पाद वाढण्यासाठी मदत होणार.

६. अतिरिक्त कर भरावा लागणार नाही.

* <u>कराचे स्लॅब :-</u>

GST प्रणाली अंतर्गत कराचे स्लॅब खालील प्रमाणे ठरविण्यात आले आहेत.

०%

५%

१२%

१८%

२८%

सोने व मौल्यवान वस्तूंवर ०.२५% अधिक वस्तू व सेवा कर प्रणालीमध्ये मुख्यत: तीन प्रकार आहेत.

१. ***केंद्रीय वस्तू आणि सेवा कर (CGST) :-***

हा कर केंद्रीय शासनातर्फे राज्यामध्ये आकारला जातो. उदा.महाराष्ट्र राज्यामध्ये येणाऱ्या सर्व वस्तू व सेवा यावर केंद्रिय शासनातर्फे कर.

२. ***राज्य वस्तू आणि सेवा कर (SGST) :-***

हा कर राज्य शासनातर्फे आकारला जातो. उदा.महाराष्ट्र राज्यामध्ये येणाऱ्या सर्व वस्तू व सेवा कर यावर राज्य शासनातर्फे कर.

३. ***एकीकृत वस्तू आणि सेवा कर (IGST) :-***

हा कर केंद्रिय शासनातर्फे आकारला जातो. उदा. महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांमध्ये वस्तू व सेवा यांची देवाणघेवाण होत असेल तर त्यावर कर हा फक्त केंद्रीय शासनातर्फे आकारला जातो.

Goods and Services Council ही मध्यवर्ती वैधानिक संस्था GST चे नियमन करते.केंद्रीय अर्थमंत्री या परीषदेचे प्रमुख असतात.

* ***सर्वेक्षण पूर्वतयारी (Survey Preperation) :-***

शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गातील ८० विद्यार्थ्यांना चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा करप्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण या विषयावर एक प्रश्नावली देण्यात आली. प्रश्नावली तयार करण्याचे कार्य व्यावसायीक अर्थशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रा.विजय कुंडलिक वाकोडे यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रश्नावली मुलाखतीच्या माध्यमातुन कशी भरुन घ्यायची या संदर्भात महत्वपुर्ण सूचना देण्यात आल्या. प्रश्नावली तयार करीत असतांनासुध्दा त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यात आला.

* ***सर्वेक्षणाचे उद्देश ( Objectives of Survey ) :-***

महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी. तसेच मुलाखत तंत्र अवगत व्हावे आणि वस्तू व सेवा करप्रणाली विषयी माहिती व्हावी,त्यातील समस्यांची जाणीव व्हावी या उद्देशाने हे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाचे मुख्य उद्देश खालील प्रमाणे होते.

१. अगोदरच्या करप्रणालीपेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली कशी आहे ते जाणून घेणे.
२. GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत काय ते जाणून घेणे.
३. GST चा भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय ते जाणून घेणे.
४. GST भरतांना येणाऱ्या अडचणी जाणून घेणे.
५. GST चा व्यापारावर, वस्तूंच्या किंमतीवर तसेच ग्राहकसंख्येकर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.

* ***<u>गृहितकृत्ये ( Hypoyhesis) :-</u>***

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात सर्वेक्षण करतांना खालील प्रकारची गृहीतकृत्य घेण्यात आली.

१. अगोदरच्या कर प्रणाली पेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली सोपी आहे.
२. GST अंतर्गत येणाऱ्या काही वस्तू व सेवावर आकारले जाणारे कराचे दर योग्य नाहीत.
३. GST भरणा करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेला कालवधी कमी आहे.
४. GST भरतांना वेगवेगळया प्रकारच्या अडचणी उद्भवतात.
५. GST चा व्यापारावर, वस्तूंच्या किमंतीवर तसेच ग्राहक संख्येवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

* ***<u>सर्वेक्षणाचे व्याप्ती ( Scope of Survey ) :-</u>***

सदर सर्वेक्षणाची व्याप्ती चिखली तालुक्यापुरती मर्यादित असून चिखली तालुक्यातील GST धारक व्यापारी वर्गाचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

* ***<u>सर्वेक्षणाचे कालावधी ( Periods of Survey ) :-</u>***

सदर सर्वेक्षण शैक्षणिक सत्र २०१८-१९ मध्ये करण्यात आले असून डिसेंबर २०१८ आणि जानेवारी २०१९ या दोन महिन्यात करण्यात आले आहे.

* ***सर्वेक्षणाचे मर्यादा ( Limitations of Survey ) :-***

सदर सर्वेक्षणाच्या मर्यादा खलील प्रमाणे आहेत.

१. सदर सर्वेक्षण बुलडाणा जिल्हयातील चिखली तालुक्यापुरतेच मर्यादित आहे.
२. चिखली तालुक्यातील केवळ GST धारक व्यापाऱ्यांचाच सदर सर्वेक्षणात समावेश केला आहे.
३. सदर सर्वेक्षण महाविद्यालयातील द्वितीय वर्ष वाणिज्यच्या विद्यार्थ्यांनी व्यापाऱ्यांना प्रश्नावली देवून व मुलाखती घेवून केले आहे.

* ***सामग्री संग्रहण पध्दती ( Methods of Data Collection ) :-***

सदर सर्वेक्षण करतांना प्राथमिक तसेच दुय्यम सामग्री स्त्रोत्रांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली यांचा वापर करण्यात आला आहे. तर दुय्यम स्त्रोतांमध्ये वर्तमानपत्रे,शासकीय परिपत्रके, इंटरनेट GST वरील पुस्तके, संशोधनावरील पुस्तके, अहवाल मासिके, इत्यादिंचा समावेश आहे.

* ***सर्वेक्षणाचे महत्व ( Importance of Survey ) :-***

सदर सर्वेक्षण महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी केले असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी त्यांच्यामध्ये चिकित्सक वृत्तीचा विकास व्हावा आणि GST विषयी माहिती व्हावी या दृष्टिने करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणाचे महत्व खालील प्रमाणे आहे.

१. चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांची वस्तू व सेवा कर प्रणाली विषयी काय धारणा आहे. ते समजून घेण्यासाठी हे सर्वेक्षण महत्वाचे ठरेल.
२. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना GST विषयी माहिती जाणून घेण्यासाठी तसेच व्यापाऱ्यांकडून प्रश्नावली भरुन घेतांना त्यांच्या GST विषयी समस्या जाणून घेण्यासाठी प्रस्तुत सर्वेक्षण उपयुक्त ठरेल.

३. या अगोदर असलेल्या करप्रणालीपेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली कशी आहे हे जाणून घेण्यासाठी सदर सर्वेक्षण उपयुक्त ठरेल.

४. GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू व सेवावरील आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत किंवा नाहीत ते व्यापाऱ्यांच्या दृष्टिकोनातुन समजून घेण्यासाठी हे सर्वेक्षण उपयुक्त ठरेल.

५. चिखली तालुक्यातील व्यापाऱ्यांना GST भरतांना कोणत्या अडचणी उद्भवतात त्याची माहिती जाणून घेण्यासाठी सादर सर्वेक्षण उपयुक्त ठरेल.

६. चिखली तालुक्यातील व्यापारावर वस्तूच्या किमतीवर ग्राहक संख्येवर काय परिणाम झाला आहे. त्यांची माहिती जाणून घेण्यासाठी सदर सर्वेक्षण उपयुक्त ठरेल.

७. चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांकडून GST संदर्भात काय सुधारणा होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांचे मत जाणून घेण्यासाठी सदर सर्वेक्षण उपयुक्त ठरेल.

* ***<u>सर्वेक्षणाचे आराखडा ( Survey Design ) :-</u>***

सर्वेक्षणाची रुपरेषा निश्चित करण्यासाठी सर्वेक्षण आराखडा तयार करणे आवश्यक असते.सदर सर्वेक्षण करण्यासाठी महाविद्यालयातील द्वितीय वर्ष वाणिज्य वर्षातील ८० विद्यार्थ्यांना चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांकडून प्रश्नावली भरुन आणण्यास सांगितले गेले. प्रत्येक विद्यार्थ्याला ५ प्रश्नावली देण्यात आल्या. अश्या प्रकारे एकूण ४०० व्यापाऱ्यांकडून प्रश्नावली भरुन आणल्या गेल्या, त्यांनतर त्याचे संकलन करुन त्याचे वर्गीकरण व विश्लेषण केल्या गेले. विश्लेषण करुन त्या आधारे निष्कर्ष, शिफारशी व उपयायोजना सुचविल्या गेल्या.

* ***नुमना निवड ( Sampling ) :-***

सर्वेक्षणाच्या उध्दिष्टयानुसार सर्वेक्षण आराखडा तयार केल्यानंतर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना चिखली तालुक्यातील केवळ GST धारक व्यापारयांचीच सर्वेक्षणासाठी निवड केल्या गेली. विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ GST धारक व्यापाऱ्यांकडे जाऊन प्रश्नावली व मुलाखतीच्या माध्यमातून माहिती जमा करण्यासाठी सांगितले गेले.

* ***माहिती संकलन( Collegetion of Data ) :-***

सदर सर्वेक्षण करण्यासाठी आवश्यक ती माहिती गोळा करणे म्हणजेच माहितीचे संकलन होय. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडे प्रश्नावली दिल्यानंतर त्यांनी प्रश्नावलीच्या तसेच प्रत्यक्ष मुलाखतीच्या आधारे चिखली तालुक्यातील एकुण ४०० GST धारक व्यापाऱ्यांकडून माहितीचे संकलन केले. माहितीचे संकलन करतांना विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. काही व्यापाऱ्यांनी आपला GSTIN नंबर देण्यात मनाई केली तर काहीनी आम्हाला वेळ नाही अशा प्रकारची कारणे सांगितली. असे असतांना देखील महाविद्यालयातील ८० विद्यार्थ्यांनी ४०० व्यापाऱ्यांच्या माहितीचे संकलन केले.

* ***माहितीचे वर्गीकरण ( Classification of Data) :-***

संकलित केलेल्या माहितीला सुयोग्य/व्यवस्थाबध्द पध्दतीने वर्गीकृत करणे म्हणजे माहितीचे वर्गीकरण होय. संकलीत केलेली माहिती विखुरलेली असते त्यामुळेच माहितीचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. माहितीचे विश्लेषण करण्यासाठी माहितीचे वर्गीकरण करणे महत्वपूर्ण ठरते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या माहितीचे योग्य पध्दतीने वर्गीकरण करुन ही माहिती विश्लेषणासाठी वापरली जाते. माहितीचे वर्गीकरण करतांना प्रश्नावलीमध्ये जे १२ प्रश्न दिले होते. त्या प्रत्येक प्रश्नाला GST धारक व्यापाऱ्यांने कशाप्रकारे प्रतिसाद दिला त्यांचे वर्गीकरण करण्यात आले. माहितीचे वर्गीकरण केल्यामुळे माहितीचे विश्लेषण करणे सोपे झाले.

* ***माहितीचे विश्लेषण ( Analysis of Data) :-***

माहितीचे वर्गीकरण केल्यानंतरची प्रक्रिया म्हणजे माहितीचे विश्लेषण होय.माहितीचे विश्लेषण करणे ही एक व्यापक प्रक्रिया आहे. माहितीच्या विश्लेषण प्रक्रियेत परस्परांशी संबंधीत केलेल्या माहितीचे परीक्षण करणे, त्यांचे वर्गीकरण करणे,सांकेतिकरण करणे,सारख्या व कोष्टके तयार करणे आणि त्यांनतर संख्याशास्त्रीय निष्कर्षाचे प्रतिपादन करणे,ही सर्व विश्लेषण प्रक्रियेची उपअंगे असतात.

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या माहितीचे विश्लेषण करतांना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रत्यक्ष

मुलाखतीच्या आधारे तसेच तयार केलेल्या प्रश्नावलीच्या आधारे सदर विश्लेषण करण्यात आले. सदर माहितीचे विश्लेषण करतांना सर्वेक्षणाच्या अगोदर लक्षात घेतलेल्या गृहीतकृत्यांची पडताळणी देखील करण्यात आली. सर्वेक्षणाद्वारे संकलित करण्यात आलेल्या माहितीचे प्रश्नावलीमध्ये विचारल्या गेलेल्या प्रश्नाच्या आधारे विश्लेषण करण्यात आले. सदर माहितीचे विश्लेषण करतांना ४०० GST धारक व्यापाऱ्याने भरुन दिलेल्या प्रश्नावलीचा समावेश केला आहे.

१. अगोदरच्या करप्रणालीपेक्षा वस्तु व सेवा कर प्रणाली आपणास कशी वाटते ?

अ) अत्यंत सोपी ब) सोपी क) कठीण ड ) अत्यंत कठीण


| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| अत्यंत सोपी | २० | ५.० |
| सोपी | २५० | ६२.५ |
| कठीण | १२० | ३० |
| अत्यंत कठीण | १० | २.५ |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तु व सेवा करप्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात वस्तु व सेवा कर प्रणाली लागू होण्यापुर्वी अस्तित्वात असलेल्या प्रणालीपेक्षा GST प्रणाली कशी आहे. या प्रश्नाचे उत्तर देतांना ४०० GST धारक व्यापाऱ्यांनी खालील प्रकारे प्रतिसाद दिला आहे.

चिखली तालुक्यातील २० GST धारक व्यापाऱ्यांना मागील कर प्रणालीपेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली अतिशय सोपी आहे असे वाटते. म्हणजेच ५ प्रतिशत व्यापाऱ्यांना ही प्रणाली अत्यंत सोपी वाटते.

२५० व्यापाऱ्यांना वस्तू व सेवा कर प्रणाली मागील कर प्रणालीपेक्षा सोपी आहे असे वाटते. म्हणजेच ६२.५ प्रतिशत व्यापाऱ्यांनाही प्रणाली सोपी वाटते.तर १२० व्यापाऱ्यांना मागील कर प्रणाली पेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली कठिण आहे असें वाटते म्हणजेच ३० प्रतिशत व्यापाऱ्यांना ही प्रणाली

सोपी वाटते. तर १० व्यापाऱ्यांना वस्तू व सेवा कर प्रणाली अत्यंत किचकट,क्लिष्ट,अत्यंत कठीण वाटते. म्हणजेच २.५ प्रतिशत व्यापाऱ्यांना ही प्रणाली अत्यंत कठीण वाटते.





२. GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत काय ?

अ) होय ब) नाही

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| होय | १२४ | ३०.००% |
| नाही | २७६ | ६९.००% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू व सेवांवकर आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत काय या प्रश्नावलीतील प्रश्नांना व्यापाऱ्यांनी दिलेला प्रतिसाद खालील प्रमाणे आहे.

१२४ व्यापाऱ्यांनी म्हणजेच ३१.००% व्यापाऱ्यांनी कराचे दर योग्य आहेत असा प्रतिसाद दिला तर २७६ व्यापाऱ्यांनी म्हणजेच ६९.००% व्यापाऱ्यांनी GST अंतर्गत आकारण्यात येणारे कराचे दर योग्य नाहीत असा प्रतिसाद दिला आहे.




उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांना GST अंतर्गत वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ३१.००% व्यापाऱ्यांनी कराचे दर योग्य आहेत असा प्रतिसाद दिला तर ६९.००% व्यापाऱ्यांनी GST कर प्रणाली अंतर्गत वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर योग्य नाहीत असा प्रतिसाद दिला.


३. GST भरणा करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय ?

अ) होय ब) नाही

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| होय | १७५ | ४३.७५% |
| नाही | २२५ | ५६.२५% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना १७५ व्यापाऱ्यांनी होय कालावधी योग्य आहे असा प्रतिसाद दिला तर २२५ व्यापाऱ्यांनी नाही GST चा भरणा करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेला कालावधी योग्य

नाही असा प्रतिसाद दिला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखतीवरुन असे दिसून आले की, दर तीन महिन्याला GST चा भरणा करावा लागतो. यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होतात त्यामुळे निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य नाही असा ५६.२५% व्यापाऱ्यांनी प्रतिसाद दिला आहे.





उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांना GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ४३.७५% व्यापाऱ्यांनी होय असा प्रतिसाद दिला तर ५६:२५ % व्यापाऱ्यांनी नाही असा प्रतिसाद दिला.

४. GST भरणा करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय ?

अ) होय ब) नाही

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| होय | २९७ | ७४.२५% |
| नाही | १०३ | २५.७५% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST भरतांना अडचणी उद्‌भवतात काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना २९७ व्यापाऱ्यांनी होय म्हणजेच अडचणी उद्‌भवतात तर १०३ व्यापाऱ्यांनी नाही म्हणजेच अडचणी उद्‌भवत नाहीत असा प्रतिसाद दिला. चिखली तालुक्यातील अनेक GST धारक व्यापाऱ्यांनी अनेकवेळा तांत्रिक स्वरुपाच्या अडचणी निर्माण होतात. तर काहीनी वर्षभरातून अनेक वेळा GST चा भरणा करावा लागतो त्यामुळे वेत ज़ातो अशा प्रकारच्या अडचणी निर्माण होतात तर काही व्यापाऱ्यांनी CA ला अधिक फि द्यावी लागते अशी प्रत्यक्ष मुलाखत घेतांना अडचणी विशद केल्या.





उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांना GST भरतांना अडचणी उद्‌भवतात काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ७४.२५% व्यापाऱ्यांनी होय म्हणजेच अडचणी उद्‌भवतात तर २५.७५% व्यापाऱ्यांनी नाही म्हणजेच अडचणी उद्‌भवत नाहीत असा प्रतिसाद दिला.

५. अडचणी उद्‌भवत असल्यास त्या कोणत्या प्रकारच्या आहेत ?

अ) तांत्रिक ब) वेळखाऊ क) इतर

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| तांत्रिक | १८७ | ४६.७५% |
| वेळखाऊ | ६८ | १७.००% |
| इतर | १४५ | ३६.२५% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात अडचणी उद्‌भवत असल्यास त्या कोणत्या प्रकारच्या आहेत या प्रश्नाला प्रतिसाद देतांना १८७ व्यापाऱ्यांनी तांत्रिक स्वरुपाच्या अडचणी उद्‌भवतात असा प्रतिसाद दिला तर ६८ व्यापाऱ्यांनी वेळखाऊ प्रकारच्या अडचणी उद्‌भवतात असा प्रतिसाद दिला तर १४५ व्यापाऱ्यांनी इतर प्रकारच्या अडचणी उद्‌भवतात असा प्रतिसाद दिला.





उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी GST भरतांना उद्‌भवलेल्या अडचणी कोणत्या प्रकारच्या आहेत या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ४६.७५% व्यापाऱ्यांनी तांत्रिक स्वरुपाच्या अडचणी उद्‌भवतात तर १७.००% व्यापाऱ्यांनी वेळखाऊ स्वरुपाच्या अडचणी उद्‌भवतात आणि ३६.२५ % व्यापाऱ्यांनी इतर प्रकारच्या अडचणी उद्‌भवतात असा प्रतिसाद दिला.

६. GST मुळे व्यापारावर काही परिणाम झाला आहे काय ?

अ) होय ब) नाही

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| होय | ३५९ | ८९.७५% |
| नाही | ४१ | १०.२५% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST मुळे व्यापारावर काही परिणाम झाला आहे काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ३५९ व्यापाऱ्यांनी होय परिणाम झाला आहे असा प्रतिसाद दिला तर ४१ व्यापाऱ्यांनी नाही काहीही परिणाम झाला नाही असा प्रतिसाद दिला.





उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी GST मुळे व्यापाऱ्यांवर परिणाम झाला आहे किंवा नाही त्यांचे प्रतिशत प्रमाण दर्शविले आहे. ८९.७५% व्यापाऱ्यांनी GST मुळे व्यापाऱ्यांवर परिणाम झाला आहे असा प्रतिसाद देतात तर १०.२५% व्यापाऱ्यांनी GST मुळे व्यापाऱ्यांवर परिणाम झाला नाही असा प्रतिसाद दिला आहे.

७. परिणाम झाला असल्यास तो कशा प्रकारचा आहे ?

अ) सकारात्मक     ब) नकारात्मक     क) मुळीच नाही

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| सकारात्मक | १५७ | ३९.२५% |
| नकारात्मक | २०२ | ५०.५०% |
| मुळीच नाही | ४१ | १०.२५% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST मुळे व्यापाऱ्यांवर कशाप्रकारचा परिणाम झाला आहे. या प्रश्नाला प्रतिसाद देताना १५७ व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा व्यापाऱ्यावर सकारात्मक परिणाम झाला आहे असा प्रतिसाद दिला आहे तर २०२ व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा व्यापाऱ्यांवर नकारात्मक परिणाम झाला आहे असा प्रतिसाद दिला आहे आणि ४१ व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा व्यापाऱ्यांवर कोणाताही परिणाम झाला नाही असा प्रतिसाद दिला आहे.





उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा व्यापाऱ्यावर झालेला परिणाम कशा प्रकारचा आहे या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ३९.२५% व्यापाऱ्यांनी सकारात्मक परिणाम झाला आहे असा प्रतिसाद दिला आहे तर ५०.५०% व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर नकारात्मक परिणाम झाल असल्याचे दर्शविले आहे आणि १०.२५ % व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा व्यापाऱ्यांवर मूळीच परिणाम झाला नाही असा प्रतिसाद दिला.

८. GST चा वस्तूच्या किंमतीवर परिणाम झाला आहे काय ?

अ) होय ब) नाही

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| होय | ३८० | ९५.००% |
| नाही | २० | ०५.००% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST चा वस्तूच्या किंमतीवर परिणाम झाला आहे काय या प्रश्नाला प्रतिसाद देतांना ३८० व्यापाऱ्यांनी GST चा वस्तूच्या किंमतीवर परिणाम झाला आहे असा प्रतिसाद दिला आहे तर २० व्यापाऱ्यांनी GST चा वस्तूच्या किंमतीवर परिणाम झाला नाही असा प्रतिसाद दिला.





उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात ९५.००% व्यापाऱ्यांनी GST चा वस्तूच्या किंमतीवर परिणाम झाला आहे असा प्रतिसाद दिला आहे. तर ०५.००% व्यापाऱ्यांनी GST चा वस्तूच्या किंमतीवर परिणाम झाला नाही असा प्रतिसाद दिला आहे.

९. किंमतीवर परिणाम झाला असल्यास तो कशाप्रकारचा आहे ?

अ) किंमती वाढल्या  ब) किंमती कमी झाल्या  क) अगोदर जशा होत्या तशाच आहेत.

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| किंमती वाढल्या | ३५२ | ८८.००% |
| किंमती कमी झाल्या | २८ | ०७.००% |
| स्थिर आहेत | २० | ०५.००% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST चा किंमतीवर झालेला परिणाम कशाप्रकारचा आहे. या प्रश्नाला प्रतिसाद देताना ३५२ व्यापाऱ्यांनी GST मुळे वस्तूच्या किंमती वाढल्या आहेत असा प्रतिसाद दिला तर केवळ २८ व्यापाऱ्यांनी वस्तूच्या किंमती कमी झाल्या आहेत असा प्रतिसाद दिला आणि २० व्यापाऱ्यांनी अगोदर किंमती जशा होत्या तशाच आहेत म्हणजे किंमती स्थिर आहेत असा प्रतिसाद दिला आहे.




उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST चा वस्तूच्या किंमतीवर कशाप्रकारचा परिणाम झाला आहे त्याचे प्रतिशत प्रमाण दर्शविले आहे. ८८.००% व्यापारी GST मुळे वस्तूंच्या


किंमती वाढल्या आहेत असे म्हणतात. तर ०७.००% व्यापारी किंमती कमी झाल्या आहेत असा प्रतिसाद देतात तर ०५.०० % व्यापारी किंमती अगोदर जशा होत्या तशाच आहेत असा प्रतिसाद दिला.

१०. GST प्रणालीमुळे ग्राहकांच्या संख्येवर परिणाम झाला काय ?

अ) संख्या वाढली ब) संख्या कमी झाली क) स्थिर आहे

| प्रश्न विश्लेषण | व्यापाऱ्यांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|
| संख्या वाढली | २२ | ०५.५०% |
| संख्या कमी झाली | ३३२ | ८३.००% |
| स्थिर आहेत | ४६ | ११.५०% |

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST चा किंमतीवर झालेला परिणाम कशाप्रकारचा आहे. या प्रश्नाला प्रतिसाद देताना २२ व्यापाऱ्यांनी ग्राहक संख्या वाढली असा प्रतिसाद दिला तर ३३२ व्यापाऱ्यांनी GST मुळे ग्राहक संख्या कमी झाली असा प्रतिसाद दिला आणि ४६ व्यापाऱ्यांनी ग्राहक संख्या स्थिर आहे असा प्रतिसाद दिला आहे.



उपरोक्त स्तंभालेखामध्ये चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी वस्तू व सेवा कर प्रणालीचा संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात GST मुळे ग्राहकांच्या संख्येवर परिणाम झाल आहे काय या प्रश्नाला दिलेल्या प्रतिसादाचे प्रतिशत प्रमाण दर्शविले आहे. ०५.५०% व्यापारी GST मुळे ग्राहक संख्या वाढली असा प्रतिसाद दिला आहे. तर ८३.००% व्यापाऱ्यांनी GST मुळे ग्राहक संख्या कमी झाली आहे असा प्रतिसाद दिला आणि ११.५०% व्यापाऱ्यांनी ग्राहक संख्या स्थिर आहे असा प्रतिसाद दिला.

११. GST प्रणालीबाबत कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे असे आपणास वाटते ?

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तु व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणात व्यापाऱ्यांना GST प्रणाली बाबत कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे असे आपणास वाटते अशा प्रकारचा विश्लेषणात्मक स्वरुपाचा प्रश्न विचारण्यात आला होता. सदर प्रश्नाचे विश्लेषण करतांना प्रत्येक व्यापाऱ्यांने वेगवेगळ्या प्रकारे विश्लेषणात्मक उत्तरे दिली आहे. सर्वसाधारणपणे काही व्यापाऱ्यांनी GST प्रणालीबाबत कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे असे आपणास वाटते या प्रश्नाला खालीलप्रमाणे प्रतिसाद दिला आहे.. . त्यांच्याच शब्दात. . . .

* GST Return Filling साठी अधिक वेळ मिळावा किंवा जर GST Return निर्धारीत काळात भरले गेले नसेल तर पुढील तिमाहीत वेळ मिळावा आणि त्यांनतर Late Fee लावावी.

* GST rate rewise झाल्यानंतर त्याचा लाभ किरकोळ विक्रेत्यांसोबत अंतिम ग्राहकापर्यत पोहोचे पर्यत शासनाने लक्ष घालावे.

* GST rate च्या slab मध्ये कमी करुन ज्या वस्तूंच्या किंमती घटल्यामुळे विक्रीच्या संधीत वाढ होवून कर वसुलीमध्ये लक्षणीय घट होणार नसेल अशा वस्तूचे GST Rate कमी करावे. जेणे करुन शासनाच्या तिजोरीवरही नकारात्मक परिणाम होणार नाही.

* GST दर महिन्याऐवजी तीन महिन्याला सादर करावे. GST टक्केवारी कमी करावी.

* तांत्रिक अडचणी दूर कराव्यात.
* GST कालावधी वार्षिक होणे आवश्यक आहे.
* आवश्यक वस्तुवरील GST कमी असावा.
* GST रिटर्न फाईल भरतांना खूप वेळ लागतो.
* GST लहान वस्तूवंर नको.
* प्रक्रिया सोपी करावी.
* औषधीवरील GST १२% वरुन ५% पर्यत आणावा.
* सरकारने व्यापाऱ्यांना GST कसा करावा याचे प्रशिक्षण घेवून समजावून सांगावे.
* बियाणे रासायनिक खते, किटकनाशके करमुक्त व्हावीत ज्याचा फायदा थेट शेतकऱ्यापर्यं पोहचेल.
* सेवाकर हा वर्षातून एकदाच भरला पाहिजेत.

१२. GST प्रणालीबाबत आपले थोडक्यात मत....

सदर प्रश्नसुध्दा विश्लेषणात्मक स्वरुपाचा प्रश्नावलीमध्ये विचारण्यात आला होता. य प्रश्नाला प्रतिसाद देतांना चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांनी खाली प्रमाणे उत्तरे दिल आहेत ती त्यांच्याच शब्दात.

* GST प्रणाली सोपी आहे.
* GST प्रणालीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.
* दिर्घकाळात GST.चे फायदे मिळतील
* तांत्रिक अडचणी दूर कराव्यात

* सोपी व सुटसुटीत करावी

* GST रिटर्न भरतांना वेळ अधिक लागतो तो कमी करावा

* GST प्रणाली देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी चांगली आहे.

* GST प्रणालीमुळे सरकारच्या उत्पन्नात वाढ होईल.

* कर चोरीला आळा बसेल

* एक देश, एक कर फार चांगली आहे.

* GST प्रणाली समजायला वेळ लागेल पण फायद्याची आहे.

* योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे आवश्यक

* GST मुळे कर भरण्यासाठी सी.ए. ला अधिक पैस द्यावे लागत आहेत.

* अगोदरची कर प्रणाली चांगली होती ही फार वेळखाऊ आहे.

* Not good, Not bad

* देशाची अर्थव्यवस्था सुधारु शकते.

* गृहितकृत्यांचा पडताळा (Verification of Hypothesis) :-

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणाची पाच गृहितकृत्ये घेण्यात आली होती. सदर गृहितकृत्यांची पडताळणी खालील प्रमाणे आहे.

१. अगोदरच्या कर प्रणालीपेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली सोपी आहे.

सदर गृहितकृत्यांची पडताळणी करतांना GST धारक व्यापाऱ्यांनी भरुन दिलेल्या प्रश्नावली विश्लेषण केल्यानंतर असे दिसून आले की, ५% व्यापाऱ्यांना अगोदरच्या कर प्रणालीपेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली अंत्यत सोपी आहे असे वाटते तर ६२.५% व्यापाऱ्यांना ही करप्रणाली सोपी आहे

असे वाटते तर ३०.००%व्यापाऱ्यांना ही करप्रणाली कठिण आहे असे वाटते आणि २.५% व्यापाऱ्यांना ही करप्रणाली अत्यंत कठिण आहे असे वाटते यावरुन असा निष्कर्ष निघतो की,६२.५% व्यापाऱ्यांना ही कर प्रणाली सोपी वाटते म्हणजेच अगोदरच्या करप्रणाली पेक्षा वस्तू व सेवा कर प्रणाली सोपी आहे. हे गृहितकृत्ये खरे ठरते.

२. GST अंतर्गत येणाऱ्या वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर अधिक आहेत.

सदर गृहित कृत्यांची पडताळणी करतांना असे दिसून आले की ३१.००% व्यापाऱ्यांना GST अंतर्गत आकारण्यात येणारे कराचे दर योग्य नाहीत असे वाटते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जेंव्हा व्यापाऱ्यांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली तेंव्हा अनेक व्यापाऱ्यांनी काही वस्तूवर व सेवावर आकारण्यात येणारे कराचे दर फार अधिक आहेत ते योग्य नाहीत असे स्पष्ट केले. यावरुन हे गृहितकृत्य सत्य ठरते.

३. GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी कमी आहे.

सदर गृहितकृत्यांची पडताळणी करतांना असे दिसून आले की, ४३.७५% व्यापाऱ्यांनी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य आहे असे स्पष्ट केले तर ५६.२५% व्यापाऱ्यांनी हा कालावधी योग्य नाही असे नमूद केले. या व्यापाऱ्यांनी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी कमी आहे असे नमुद केले. यावरुन घेण्यात आलेले गृहितकृत्य सत्य ठरते.

४. GST भरणा करतांना वेगवेगळया प्रकारच्या अडचणी उद्‌भवतात.

सदर गृहितकृत्याची पडताळणी करतांना असे दिसून आले की ७४.२५% व्यापाऱ्यांनी अडचणी उद्‌भवतात असे स्पष्ट केले तर २५.७५% व्यापाऱ्यांनी अडचणी उदयांनी अडचणी उद्‌भवत नाही असे स्पष्ट केले. सोबतच व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणीचे स्वरुपही वेगवेगळ्या प्रकारचे आहे आहे असे निदर्शनास आले. ४६.७५% व्यापाऱ्यांना तांत्रिक स्वरुपाच्या अडचणी आल्या असे निदर्शनास आले तर १७.००% व्यापाऱ्यांना ही प्रणाली अधिक वेळखाऊ आहे असे निदर्शनास आले आले तर ३६.२५% व्यापाऱ्यांना इतर प्रकारच्या अडचणी जसे की दर अधिक

कालावधी कमी,सी.ए. ची फी अशा प्रकारच्या अडचणी निदर्शनास आल्या. यावरुन वरील गृहितकृत्य सत्य ठरते.

५. GST चा व्यापारावर,वस्तूंच्या किंमतीवर तसेच ग्राहक संख्येवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

सदर गृहितकृत्याची पडताळणी करतांना असे दिसून आले की, GST मुळे व्यापाऱ्यावर परिणाम झाला आहे. त्यामध्ये ८९.७५% व्यापाऱ्यांनी परिणाम झाला आहे असे निदर्शनास येते तर १०.२५% व्यापाऱ्यांनी व्यापाऱ्यावर परिणाम झाला नाही असे स्पष्ट केले आहे. सोबतच ३९.२५% व्यापारी म्हणतात की सकारात्मक परिणाम झाला आहे तर ५०.५०% व्यापारी म्हणतात की नकारात्मक परिणाम झाला आहे आणि १०.२५% व्यापारी म्हणतात की मूळीच परिणाम झाला नाही असे निदर्शनास आले आहे.

GST चा वस्तूच्या किंमतीवर ९५.००% व्यापारी परिणाम झाल्याचे स्पष्ट करतात तर ५.००%व्यापारी परिणाम झाला नाही असे स्पष्ट करतात.८८.०० व्यापाऱ्यांचे मते GST मुळे वस्तूच्या किंमती वाढल्या आहेत तर ०७.००% व्यापाऱ्यांच्या मते किंमती कमी झाल्या आहेत आणि ०५.००% व्यापाऱ्यांच्या मते किंमती अगोदर जशा होत्या त्या तशाच म्हणजे स्थिर आहेत असे निदर्शनास आले.

ग्राहक संख्येच्या संदर्भात ५.५% व्यापाऱ्यांच्या मते GST मुळे ग्राहकांच्या संख्येत वाढ झाली आहे तर ८३.००% व्यापाऱ्यांच्या मते GST मुळे ग्राहकांची संख्या कमी झाली आहे तर ११.५०% व्यापाऱ्यांच्या मते ग्राहक संख्यां स्थिर आहे.

वरील सर्व विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, GST चा व्यापाऱ्यांवर वस्तूंच्या किंमतीवर तसेच ग्राहक संख्येवर प्रतिकूल परिणाम झाला आहे त्यामुळे उपरोक्त गृहितकृत्ये सत्य ठरते.

## निष्कर्ष ( Conclusion ) :-

चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात करण्यात आलेल्या सर्वेक्षणातून खालील प्रकारे निष्कर्ष निघाले आहेत.

१. १ जुलै २०१७ पासून भारतात सुरु झालेली वस्तू व सेवा कर प्रणाली अगोदरच्या कर प्रणालीपेक्षा सोपी आहे.

२. GST अंतर्गत येणाऱ्यां काही वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर अधिक आहेत.

३. GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी कमी आहे

४. GST भरतांना अनेक प्रकारच्या अडचणी उद्‌भवतात या अडचणी तांत्रिक स्वरुपाच्या व वेळखाऊ आहेत.

५. GST मुळे व्यापाऱ्यांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे

६. GST मुळे काही वस्तू व सेवांच्या किंमतीत वाढ झाली आहे परिणामत: वस्तू व सेवांची मागणी कमी झाली आहे.

७. GST प्रणालीमुळे ग्राहकांची संख्या कमी झाली आहे.

* **शिफारशी व उपाय योजना ( Recommandations & Remedies):-**

डिसेंबर २०१८ आणि जानेवारी २०१९ या कालावधीत चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण या विषयावर महाविद्यालयातील व्यावसायिक अर्थशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रा.विजय कुंडलीक वाकोडे आणि द्वितीय वर्ष वाणिज्यचे ८० विद्यार्थी यांनी सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणावरुन वस्तू व सेवाकर प्रणाली संदर्भात खालीलप्रमाणे शिफारशी व उपाय योजना सूचविण्यात येत आहेत.

१. GST अंतर्गत येणाऱ्या काही वस्तू व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर अधिक आहेत ते कमी करणे आवश्यक आहे.

२. GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी कमी आहे तो वाढविणे आवश्यक आहे.

३. GST भरतांना अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण झाल्या आहेत जसे की तांत्रिक अडचणी निर्माण

झाल्या आहेत जसे की तांत्रिक अडचणी, वेळ अधिक लागतो त्या दूर करणे आवश्यक आहे.

४. GST मुळे व्यापाऱ्यांवर प्रतिकुल परिणाम झाला आहे तो टाळण्यासाठी GST मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

५. GST मुळे काही वस्तू व सेवांच्या किंमतीत वाढ झाली आहे आणि त्यामुळे वस्तूची मागणी सुध्दा घटली आहे परिणामत: व्यापाऱ्यांवर GST चा प्रतिकुल परिणाम झाला आहे. हा प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी GST चे दर कमी करणे तसेच इतर प्रकारच्या सुधारणा करणे आवश्यक आहे.

६. GST मुळे ग्राहकांची संख्या घटली आहे ती वाढविण्यासाठीं योग्य प्रकारच्या उपाय योजना करणे आवश्यक आहे.

* **<u>सारांश ( Summary) :-</u>**

भारतात १ जुलै २०१७ पासून नविन वस्तू व सेवा कर प्रणाली लागू झाली आहे. या प्रणालीमुळे संपूर्ण देशात एक राष्ट्र, एक कर आणि एक संघ बाजारपेठ निर्माण होईल आणि अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होईल असे नमुद करण्यात होते. वस्तू व सेवा करप्रणालीमुळे एक्साईज डयुटी, व्यावसायिक कर, विक्री कर, मनोरंजन कर, प्रवेश कर,खरेदी कर, जाहिराती कर तसेच सेवा कर हा एकच कर राहील असेही सांगण्यात आले परंतु प्रत्यक्षात ही प्रणाली लागू झाल्यानंतर व्यापाऱ्यांमध्ये सर्व सामान्य नागरीकांमध्ये तसेच सरकारमध्येही अनेक प्रकारचे संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून आले. सरकारने अनेक वेळा या प्रणालीमध्ये सुधारणा केल्या आहेत. या अनुषंगानेच महाविद्यालयातीन विद्यार्थ्यांना GST विषयी माहिती व्हावी. नविन कर प्रणाली समजून घेता यावी आणि या प्रणालीबाबत चिखली तालुक्यातील व्यापाऱ्यांच्या काय प्रतिक्रीया आहेत,त्यांनी ही प्रणाली कशी वाटते यासाठी डिसेंबर २०१८ आणि जानेवारी २०१९ या दोन महिन्यामध्ये द्वितीय वर्ष वाणिज्यच्या ८० विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अर्थशास्त्र विषयाचे विभागप्रमुख प्रा.विजय कुंडलीक वाकोडे यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तु व सेवा कर प्रणाली संदर्भात

एक सर्वेक्षण या विषयावर सर्वेक्षण करण्यात आले. सदर सर्वेक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये मुलाखत घेण्या तंत्र,प्रश्नावली तयार करण्याचे तंत्र,तसेच प्रत्यक्षात व्यापाऱ्यांना भेटून त्यांची GST विषयक म इ.बाबीचे अध्ययन करता आले. ८० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ प्रश्नावली म्हणजे एकूण ४०० प्रश्नावल चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांकडून भरुन घेण्यात आल्या. बऱ्याच व्यापाऱ्यांनी आपल GSTIN देण्यास नकार दिला त्यांना त्या ठिकाणी असे सांगावे लागले की या प्रश्नावलीचा वाप केवळ शैक्षणिक कार्यासाठीच केला जाणार आहे आणि आपण दिलेली माहिती पूर्णत: गोपनि ठेवण्यात येणार आहे अशा प्रकारची सूचना प्रश्नावलीमध्ये नमूद करण्यात आली होती.

सदर प्रश्नावलीमध्ये एकुण १२ GST विषयक प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. पैक ११ व १२ वा हे दोन प्रश्न विश्लेषनात्मक स्वरुपाचे विचारण्यात आले होते. उर्वरीत १० प्रश्न वस्तूनि स्वरुपाचे होते. विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरुन घेण्यासोबतच व्यापाऱ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीसुध्दा घेतल्य सदर सर्वेक्षणाच्या माध्यमातून GST विषयक जे निष्कर्ष निघाले त्यावर आधारीत शिफारशी उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत. या सर्वेक्षणामुळे GST मुळे व्यापाऱ्यांना कोणत्या समस्य उद्भवल्या,ही पध्दती अधिक सोपी व सुटसुटीत कशी होईल त्यासाठी हे सर्वेक्षण अतिशय महत्वपू ठरेल असा विश्वास वाटतो.

* **<u>परिशिष्ट (Annexure) :-</u>**

१) प्रश्नावली

२) सर्वेक्षणकर्त्या विद्यार्थ्यांची यादी

३) व्यापाऱ्याने भरलेली प्रश्नावली (नमुना)

# S.P.M. Tatyasaheb Mahajan Arts & Commerce College, Chikhli

SURVEY GUIDANCE : PROF. VIJAY KUNDLIK WAKODE

| NameOfStudent | Class |
|---|---|
| Mr. Gopal Bhaskar Kharat | B.COM.2 |
| Ku. Priya Haribhau Fulzade | B.COM.2 |
| Mr. Vishal Sitaram Parihar | B.COM.2 |
| Mr. Nilesh Rajendra Salve | B.COM.2 |
| Mr. Sagar Gajanan Gayakwad | B.COM.2 |
| Ku. Punam Bhagwat Kharat | B.COM.2 |
| Ku. Kalyani Shivshankar Devhade | B.COM.2 |
| Ku. Pooja Anil Nake | B.COM.2 |
| Mr. Pravin Baliram Dukare | B.COM.2 |
| Mr. Nitin Mukesh Padiyar | B.COM.2 |
| Ku. Pratiksha Manoj Gawai | B.COM.2 |
| Mr. Rushikesh Mohan Kharat | B.COM.2 |
| Ku. Ujjwala Subhash Kharat | B.COM.2 |
| Ku. Pooja Eknath Gande | B.COM.2 |
| Mr. Vishal Murlidhar Khandagale | B.COM.2 |
| Mr. Nagesh Pramod Deshmukh | B.COM.2 |
| Mr. Suraj Madanlal Pande | B.COM.2 |
| Mr. Ganesh Dattatray Gharpahune | B.COM.2 |
| Mr. Shubham Dinkar Awchar | B.COM.2 |
| Ku. Raksha Vijay Taramale | B.COM.2 |
| Ku. Jayashri Ramesh Sangle | B.COM.2 |
| Ku. Shubhangi Gajanan Jadhao | B.COM.2 |
| Mr. Shivshankar Shivaji Gawde | B.COM.2 |
| Mr. Rushikesh Subhash Dhore | B.COM.2 |
| Mr. Vaibhav Ramesh Arakh | B.COM.2 |
| Mr. Satish Kisan Mohite | B.COM.2 |
| Ku. Vaishali Ganesh Pathare | B.COM.2 |
| Ku. Aarti Namdeo Mehetre | B.COM.2 |
| Ku. Bhavika Dnyaneshwar Raut | B.COM.2 |
| Ms. Akash Vishnu Girhe | B.COM.2 |
| Ku. Neha Kailas Ghatte | B.COM.2 |
| Ku. Pooja Ambadas Hade | B.COM.2 |
| Mr. Kalyani Madan Dehadray | B.COM.2 |
| Ku. Jayashree Rajendra Satav | B.COM.2 |
| Mr. Ajay Govinda Mankar | B.COM.2 |
| Mr. Aditya Samadhan Chinchole | B.COM.2 |
| Mr. Pavandip Damodhar Gholap | B.COM.2 |
| Mr. Mangesh Milind Kasare | B.COM.2 |

| | |
|---|---|
| Mr. Kailas Gajanan Sasankar | B.COM.2 |
| Ku. Rasika Rajendra Kulkarni | B.COM.2 |
| Ku. Sonali Sanjay Gande | B.COM.2 |
| Ku. Ankita Dnyandeo Kharat | B.COM.2 |
| Mr. Vaibhav Gajanan Dukare | B.COM.2 |
| Mr. Pandhari Kailas Gadekar | B.COM.2 |
| Mr. Vishal Ganesh Ausarmol | B.COM.2 |
| Mr. Vishal Suresh Salve | B.COM.2 |
| Ku. Rajeshree Baban Gawai | B.COM.2 |
| Mr. Bhushan Sanjay Ingle | B.COM.2 |
| Mr. Govind Gulabrao Shinde | B.COM.2 |
| Ku. Kalyani Ukarda Malode | B.COM.2 |
| Mr. Shubham Baban Aute | B.COM.2 |
| Ku. Rinku Ramesh Jadhao | B.COM.2 |
| Mr. Rushikesh Ramrao Pophale | B.COM.2 |
| Mr. Chetan Ravindra Ambekar | B.COM.2 |
| Mr. Govinda Suresh Walekar | B.COM.2 |
| Mr. Nilesh Samadhan Jadhao | B.COM.2 |
| Ku. Kiran Ganesh Maind | B.COM.2 |
| Mr. Shrikant Kailas Korde | B.COM.2 |
| Mr. Pankaj Kailas Mulavakar | B.COM.2 |
| Mr. Manohar Shriram Walke | B.COM.2 |
| Mr. Sham Samadhan Jadhao | B.COM.2 |
| Mr. Shankar Vishnu Chavan | B.COM.2 |
| Ku. Vaishnavi Atul Thengzode | B.COM.2 |
| Mr. Shubham Gajananrao Fulzade | B.COM.2 |
| Mr. Suyash Kishor Mundlik | B.COM.2 |
| Ku. Shivani Vishwanath Wankhede | B.COM.2 |
| Mr. Pavan Bhaskar Somthane | B.COM.2 |
| Mr. Rushikesh Gajanan Sonune | B.COM.2 |
| Mr. Shubham Ganesh Jagtap | B.COM.2 |
| Mr. Ankit Rajabhau Yadav | B.COM.2 |
| Mr. Akash Haribhau Dudhale | B.COM.2 |
| Mr. Devanand Subhash Khumkar | B.COM.2 |
| Ku. Nikita Ramesh Jogade | B.COM.2 |
| Ku. Alka Ashok Lokhande | B.COM.2 |
| Ku. Ashwini Santosh Tikar | B.COM.2 |
| Ku. Punam Ganesh Fundkar | B.COM.2 |
| Ku. Pallavi Bhaskar Dhadge | B.COM.2 |
| Mr. Rushikesh Rameshwar Burukale | B.COM.2 |
| Ku. Sonal Murlidhar Choudhari | B.COM.2 |
| Ku. Jayshri Nimbaji Zagare | B.COM.2 |

# शि.प्र.मं. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय, चिखली जि.बुलडाणा

## अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग

**" चिखली तालुक्यातील GST धारक व्यापाऱ्यांचे वस्तु व सेवा कर प्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण " या विषयाची प्रश्नावली**

---

नांव : ------------------------------------------------------------------

पत्ता : ------------------------------------------------------------------

वार्षिक टर्नओव्हर :-------------------- GST No.:--------------------------

**टिप : खालील माहितीचा वापर केवळ शैक्षणिक कार्यासाठीच केला जाईल व ही माहिती गोपनिय ठेवण्यात येईल.**

१ अगोदरच्या करप्रणालीपेक्षा वस्तु व सेवा कर प्रणाली आपणास कशी वाटते ?
अत्यंत सोपी ☐ सोपी ☐ कठीण ☐ अत्यंत कठीण ☐

२ GST अंतर्गत येणाऱ्या वस्तु व सेवांवर आकारले जाणारे कराचे दर योग्य आहेत काय ?
होय ☐ नाही ☐

३ GST भरणा करण्यासाठी निर्धारीत करण्यात आलेला कालावधी योग्य आहे काय ?
होय ☐ नाही ☐

४ GST भरतांना अडचणी उद्‌भवतात काय ?
होय ☐ नाही ☐

५ अडचणी उद्‌भवत असल्यास त्या कोणत्या प्रकारच्या आहेत ?
तांत्रिक ☐ वेळखाऊ ☐ इतर ☐

६ GST मुळे व्यापारावर काही परीणाम झाला आहे काय ?
होय ☐ नाही ☐

७ परिणाम झाला असल्यास तो कशा प्रकारचा आहे?
सकारात्मक ☐ नकारात्मक ☐ मुळीच नाही ☐

८ GST चा वस्तुच्या किंमतीवर परिणाम झाला आहे काय?
होय ☐ नाही ☐

९ किमतीवर परिणाम झाला असल्यास तो कशा प्रकारचा आहे?
किंमती वाढल्या ☐ किंमती कमी झाल्या ☐ अगोदर जशा होत्या तशाच आहेत. ☐

१० GST प्रणालीमुळे ग्राहकांच्या संख्येवर परिणाम झाला आहे काय?
संख्या वाढली ☐ संख्या कमी झाली ☐ स्थिर आहे ☐

११ GST प्रणालीबाबत कोणत्या सुधारणा होणे आवश्यक आहे असे आपणास वाटते.
______________________________________________
______________________________________________

१२ GST प्रणालीबाबत आपले थोडक्यात मत.
______________________________________________
______________________________________________

(प्रा.विजय कुंडलिक वाकोडे)
सर्वेक्षण समन्वयक
(व्यावसायिक अर्थशास्त्र, विभाग प्रमुख)
मो.नं. ९८६०३०९५३८

प्रश्नावली भरणाऱ्याचे नाव व स्वाक्षरी
______________________
______________________

॥ विद्या परं दैवतम् ॥

SHIKSHAN PRASARAK MANDALS

**Tatyasaheb Mahajan Arts & Commerce College,**

CHIKHLI Dist. Buldana - 443201 (M.S.) Fax No. (07264) 242075

Accredited with B+ NAAC

Website : spmtmchikhali.org. E-mail - principaldrtarespmchikhli@gmail.com

क्र. एसपीएम/वस्तूवसेवाकर/२०१८-१९/ . दिनांक :- .

प्रति,

मा. सर्व व्यापारी वर्ग ( GST धारक)
चिखली तालुका,
जि.बुलडाणा.

विषय :- वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात प्रश्नावली भरुन देणे बाबत.

महोदय,

आमच्या महाविद्यालयातील अर्थशास्त्र व वाणिज्य विभाग, ‘चिखली तालुक्यातील (GST धारक) व्यापाऱ्यांचे वस्तू व सेवा कर प्रणाली संदर्भात एक सर्वेक्षण’ करीत आहे. त्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी आपणाकडे प्रश्नावली भरुन घेण्यासाठी आले आहेत.

कृपया आपण ती प्रश्नावली भरुन देण्यासाठी सहकार्य करावे. आपण दिलेल्या माहितीचा उपयोग केवळ शैक्षणिक कार्यासाठीच केला जाईल तसेच आपण दिलेली माहिती गोपनिय ठेवण्यात येईल.

आपले विश्वासु,

( प्रा. विजय कुंडलिक वाकोडे )
समन्वयक,
GST सर्वेक्षण
मो.नं.९८६०३०९५३८

( डॉ. अनिल स.पुरोहित )
प्र. प्राचार्य,
**PRINCIPAL**
S. P. M. T.M. Arts & Commerce College
CHIKHLI 443201 (Dist.Buldana)

**A Survey on GST Holder Traders in Chikhli Taluka Regarding Goods and Service Tax.**

**Summary of the Report**

A new goods and service tax come into force in India from July 1st 2017. It was stated that one nation, one tax and single market would be created across the country and the economy benefit from it. It was also said that due to the goods and service tax system excise duty business tax sales tax entertainment tax advertisement tax and service tax will remain a single tax . But in reality, after the implementation of this system, it was seen that many types of confusion arose among the traders as well as the common citizens and the government.The government has reformed the system several times.Accordingly, college students should be informed about GST, understand the new tax system and what are the reactions of traders in Chikhli taluk regarding this system, how do they feel about this system.For this, in the two months , December 2018 and January 2019, 80 students of B.Com second year, Head of the Department of Business Economics, Prof.Prof. Vijay Wakode was conducted a survey on "A Survey of GST Holder Traders in Chikhli Taluka regarding Goods and Services Tax System".Due to the said survey, the students were able to study the techniques of conducting interviews, the techniques of preparing questionnaires and actually meeting the traders and their views on GST etc.

Five questionnaires each to 80 students i.e. total 400 questionnaires were filled by GST holder traders in Chikhli taluka. Many traders refused to give their GSTIN, they had to say that this questionnaire will be used for educational purposes only and the information provided by them will be kept strictly confidential and such instruction was mentioned in the questionnaire.

A total of 12 GST related questions were included in the said questionnaire.The eleventh and twelfth questions were analytical in nature.Remaining 10 questions were objective in nature. Apart from filling the questionnaire, the students also conducted face-to-face interviews with the traders.Recommendations and measures have been suggested based on the findings regarding GST through the said survey.It is believed that this survey will be very important to find out the problems faced by traders due to GST, how to make the process simpler and easier.

**Prof. Vijay Kundlik Wakode.(Survey Coordinator)**

**Head Department of Business Economics,**

**S.P.M.T.M. Art's and Commerce College Chikhli Dist Buldhan**